RNI No. MAHBIL / 2012/47985
www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग एक-अ–पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - १५, अंक - २१ ] शुक्रवार, जुलै १७, २०२६ / आषाढ २६, शके १९४८ [ पृष्ठ ०५

## असाधारण क्रमांक २१

## प्राधिकृत प्रकाशन

### विभागीय आयुक्त यांजकडून

**वाचा :--** १) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १० *(१-ई).*

२) मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील आदेश व पत्र क्रमांक रानिआ-२०२३/उनिख/प्र.क्र.१३/संगणकीकरण कक्ष (ब), दिनांक १५ फेब्रुवारी २०२४.

३) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.८०/का-५, दिनांक १५ डिसेंबर २०२५.

४) आयुक्त, सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिका यांचेकडील पत्र जा.क्र./मनपा/लेखा/वि/१४६/२०२६-२७, दिनांक ५ जून २०२६ (प्राप्त दिनांक ८ जून २०२६).

### आदेश

क्रमांक नपाप्र/४/मनपा/एसआर/४१/२०२६.—ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १० *(१-ई)* अन्वये ज्या उमेदवारांनी निवडणुकीमध्ये केलेल्या खर्चाचा हिशोब शपथपत्रासह, निवडणूक निकाल जाहीर झाल्यापासून ३० दिवसांचे कालावधीमध्ये सादर न केल्यास अशा उमेदवारांना अनर्ह ठरविण्याचे अधिकार विभागीय आयुक्त यांना उक्त वाचामधील संदर्भ क्रमांक २ येथील आदेशान्वये मा. राज्य निवडणूक आयोगाने प्रदान केलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ चा निकाल दिनांक १६ जानेवारी २०२६ रोजी जाहीर करण्यात आला असून, आम्रपाली लहरीदास कांबळे, प्रभाग क्रमांक १५-क, पत्ता - बळवंत हेरिटेज, आंबेडकरनगर कमानीसमोर, सांगली-४१६ ४१६ यांनी निवडणूक खर्चाचा हिशोब निवडणूक निकाल जाहीर झालेपासून ३० दिवसांचे आत म्हणजेच दिनांक १५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत विहित केलेल्या रीतीने सादर केला नसलेबाबत आयुक्त, सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिका यांनी त्यांचेकडील उक्त वाचामधील संदर्भ क्रमांक ४ चे पत्रान्वये या कार्यालयास कळविले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १० *(१-ई)* खालीलप्रमाणे --

जर राज्य निवडणूक आयोगाची अशी खात्री झाली असेल की, एखाद्या व्यक्तीने,

(अ) राज्य निवडणूक आयोगाने निर्धारित केलेल्या वेळेमध्ये आणि आवश्यक केलेल्या रीतीने, निवडणूक खर्चाचा हिशेब देण्यात कसूर केली आहे, आणि ;

(ब) अशा प्रकारे कसूर होण्यासाठी तिच्याकडे कोणतेही योग्य कारण किंवा समर्थन नाही,

तर राज्य निवडणूक आयोग, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, ती व्यक्ती अनर्ह असल्याचे घोषित करील आणि अशी व्यक्ती, अशा आदेशाच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या कालावधीकरिता, पालिका सदस्य म्हणून राहण्यास किंवा पालिका सदस्य होण्यासाठी निवडणूक लढविण्यास अनर्ह असेल.

त्यास अनुसरून आम्रपाली लहरीदास कांबळे, प्रभाग क्रमांक १५-क, पत्ता - बळवंत हेरिटेज, आंबेडकरनगर, कमानीसमोर, सांगली-४१६ ४१६ यांना विहित कार्यपद्धतीनुसार सुनावणी घेण्यात येऊन या आदेशाद्वारे अनर्ह ठरविण्यात येत आहे.

तसेच मा. राज्य निवडणूक आयोगाचे दिनांक १५ फेब्रुवारी २०२४ चे आदेशान्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम १० *(१-ई)* नुसार अनर्ह करण्यात आलेल्या उमेदवारांचे आदेश राजपत्रात प्रसिद्ध करणेकामी तरतूद केली आहे.

त्याअर्थी, मी, शीतल तेली-उगले (भा.प्र.से.), विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे आम्रपाली लहरीदास कांबळे, प्रभाग क्रमांक १५-क, पत्ता- बळवंत हेरिटेज, आंबेडकरनगर, कमानीसमोर, सांगली-४१६ ४१६ यांना सदर आदेशाच्या दिनांकापासून तीन वर्षांचे कालावधीकरिता, पालिका सदस्य म्हणून राहण्यास किंवा पालिका सदस्य होण्यासाठी निवडणूक लढविण्यास अनर्ह असल्याचे घोषित करीत आहे.

सदर आदेश सर्व संबंधिताना कळविण्यात यावा.

**शीतल तेली-उगले** (भा.प्र.से.),
विभागीय आयुक्त,
पुणे, १४ जुलै २०२६. पुणे विभाग, पुणे.

---

**वाचा :--** १) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ कलम १६ *(१-ड).*

२) मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील आदेश व पत्र क्रमांक रानिआ-२०२३/उनिख/प्र.क्र.१३/संगणकीकरण कक्ष (ब), दिनांक १५ फेब्रुवारी २०२४.

३) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक रानिआ-२०२५/निका/नप/प्र.क्र.१४/का-६, दिनांक ४ नोव्हेंबर २०२५.

४) जिल्हा सहआयुक्त, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचेकडील पत्र जा. क्र. पसन/कावि/कार्या-५/११७४/२०२५, दिनांक १५ जून २०२६ (प्राप्त दिनांक १८ जून २०२६).

**आदेश**

क्रमांक नपाप्र/४/नपा/एसआर/४२ ते ५१ /२०२६.—ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडील क्र. रानिआ-२०२३/उनिख/प्र.क्र.१३/संगणकीकरण कक्ष (ब), दिनांक १५ फेब्रुवारी २०२४ रोजीचे आदेशानुसार 'अ' वर्ग आणि 'ब' वर्ग नगरपरिषदांच्या बाबतीत जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेले उपजिल्हाधिकारी यांनी निवडणूक खर्च हिशोब तपासणी करणे व त्यानंतर अनर्हतेबाबत निर्णय घेण्याचे अधिकार विभागीय आयुक्त यांना प्रदान करण्यात आले आहेत.

ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५, कलम १६ *(१-ड)* अन्वये ज्या उमेदवारांनी निवडणुकीमध्ये केलेल्या खर्चाचा हिशोब शपथपत्रासह, निवडणूक निकाल जाहीर झाल्यापासून ३० दिवसांचे कालावधीमध्ये सादर न केल्यास अशा उमेदवारांना अनर्ह ठरविण्याचे अधिकार विभागीय आयुक्त यांना उक्त वाचामधील संदर्भ क्रमांक २ चे आदेशान्वये मा. राज्य निवडणूक आयोगाने प्रदान केलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, उक्त वाचामधील संदर्भ क्रमांक ३ चे आदेशान्वये नगरपरिषद, नगरपंचायती सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ चा निकाल दिनांक २१ डिसेंबर २०२५ रोजी जाहीर करण्यात आला असून, पुणे जिल्ह्यातील चाकण नगरपरिषदेच्या १० उमेदवारांनी (सोबतच्या परिशिष्ट-अनुसार) निवडणूक खर्चाचा हिशोब निवडणूक निकाल जाहीर झालेपासून ३० दिवसांचे आत म्हणजेच दिनांक २० जानेवारी २०२६ पर्यंत विहित केलेल्या रीतीने सादर केला नसलेबाबत जिल्हा सहआयुक्त, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांनी त्यांचेकडील उक्त वाचामधील संदर्भ क्रमांक ४ चे पत्रान्वये या कार्यालयास कळविले आहे.

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५, कलम १६ *(१-ड)* खालीलप्रमाणे --

**निवडणूक आयोगाचे :--**

अ) अशा व्यक्तीने निवडणुकीच्या खर्चाचा हिशोब विहित कालावधीत निवडणूक आयोगाने ठरवून दिलेल्या पद्धतीनुसार, सादर केला नसेल आणि ;

ब) सादर करण्यास कोणतेही पुरेसे कारण नाही, असे समाधान झाल्यास राजपत्रात प्रसिद्ध करून अशा व्यक्तीस अपात्र ठरवून पुढील ३ वर्षांच्या कालावधीकरिता अपात्र ठरवू शकते.

त्यास अनुसरून परिशिष्ट-अमधील १० उमेदवारांना विहित कार्यपद्धतीनुसार सुनावणी घेण्यात येऊन या आदेशाद्वारे अनर्ह ठरविण्यात येत आहे.

तसेच मा. राज्य निवडणूक आयोगाचे दिनांक १५ फेब्रुवारी २०२४ चे आदेशान्वये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५, कलम १६ *(१-ड)* नुसार अनर्ह करण्यात आलेल्या उमेदवारांचे आदेश राजपत्रात प्रसिद्ध करणेकामी तरतूद केली आहे.

त्याअर्थी, मी, शीतल तेली-उगले (भा.प्र.से.), विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे परिशिष्ट-अमधील १० उमेदवारांना रकाना क्रमांक ५ मध्ये नमूद आदेशांच्या दिनांकापासून तीन वर्षांचे कालावधीकरिता, पालिका सदस्य म्हणून राहण्यास किंवा पालिका सदस्य होण्यासाठी निवडणूक लढविण्यास अनर्ह असल्याचे घोषित करीत आहे.

सदर आदेश सर्व संबंधिताना कळविण्यात यावा.

**विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचा आदेश क्रमांक नपाप्र/४/नपा/एसआर/४२ ते ५१/२०२६,**
**दिनांक १४ जुलै २०२६ सोबतचे सहपत्र**

**परिशिष्ट - अ**

| अ.क्र. | प्रभाग क्र. | उमेदवाराचे नाव | उमेदवाराचा संपूर्ण पत्ता | महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५, कलम १६ *(१-ड)* अन्वये आदेश निर्गमित केल्याचा क्र., दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | प्रभाग क्र. ५-अ | गायकवाड संगीता आनंद | आंबेठाण रोड, झित्राई मळा, चाकण. | क्रमांक नपाप्र/४/नपा/एसआर/४२/२०२६, दिनांक १४ जुलै २०२६. |
| २. | प्रभाग क्र. ३-अ | पठारे कविता नवनाथ | पठारेवाडी, चाकण, जि. पुणे | क्रमांक नपाप्र/४/नपा/एसआर/४३/२०२६, दिनांक १४ जुलै २०२६. |
| ३. | प्रभाग क्र. ४-ब | गालफाडे महेंद्र मनोहर | महात्मा फुलेनगर, चाकण | क्रमांक नपाप्र/४/नपा/एसआर/४४/२०२६, दिनांक १४ जुलै २०२६. |
| ४ | प्रभाग क्र. ४-ब | जगताप बाबासाहेब केरू | चाकण | क्रमांक नपाप्र/४/नपा/एसआर/४५/२०२६, दिनांक १४ जुलै २०२६. |
| ५. | प्रभाग क्र. ४-ब | परदेशी महेश ओमप्रकाश | बालाजी क्लासिक, चाकण | क्रमांक नपाप्र/४/नपा/एसआर/४६/२०२६, दिनांक १४ जुलै २०२६. |
| ६. | प्रभाग क्र. ६-अ | ओव्हाळ गंगाबाई बळीराम | आंबेठाण रोड, चाकण | क्रमांक नपाप्र/४/नपा/एसआर/४७/२०२६, दिनांक १४ जुलै २०२६. |
| ७. | प्रभाग क्र. ९-ब | इनामदार नसरुद्दीन जमालभाई | देशमुख आळी, चाकण | क्रमांक नपाप्र/४/नपा/एसआर/४८/२०२६, दिनांक १४ जुलै २०२६. |
| ८. | प्रभाग क्र. ९-ब | पाटील प्रदीप शंकर | खंडोबा माळ, चाकण | क्रमांक नपाप्र/४/नपा/एसआर/४९/२०२६, दिनांक १४ जुलै २०२६. |
| ९. | प्रभाग क्र. ९-ब | सिकीलकर मुजफ्फर फारूक | गोल्डन चौक, चाकण | क्रमांक नपाप्र/४/नपा/एसआर/५०/२०२६, दिनांक १४ जुलै २०२६. |
| १०. | प्रभाग क्र. १०-अ | भस्मे गीतांजली संजयकुमार | भगवान इमारत, महात्मा फुले चौक, चाकण. | क्रमांक नपाप्र/४/नपा/एसआर/५१/२०२६, दिनांक १४ जुलै २०२६. |

**शीतल तेली-उगले** (भा.प्र.से.),
विभागीय आयुक्त,
पुणे विभाग, पुणे.

पुणे, १४ जुलै २०२६.

**वाचा :--** १) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ कलम १६ *(१-ड).*

२) मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील आदेश व पत्र क्रमांक रानिआ-२०२३/उनिख/प्र.क्र.१३/संगणकीकरण कक्ष (ब), दिनांक १५ फेब्रुवारी २०२४.

३) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक रानिआ-२०२५/निका/नप/प्र.क्र.१४/का-६, दिनांक ४ नोव्हेंबर २०२५.

४) जिल्हा सहआयुक्त, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचेकडील पत्र जा. क्र. पसन/कावि/कार्या-५/११७४/२०२५, दिनांक १५ जून २०२६ (प्राप्त दिनांक १८ जून २०२६).

**आदेश**

क्रमांक नपाप्र/४/नपा/एसआर/५२ ते ६४/२०२६.—ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडील क्रमांक रानिआ-२०२३/उनिख/प्र.क्र.१३/संगणकीकरण कक्ष (ब), दिनांक १५ फेब्रुवारी २०२४ रोजीचे आदेशानुसार 'अ' वर्ग आणि 'ब' वर्ग नगरपरिषदांच्या बाबतीत जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेले उपजिल्हाधिकारी यांनी निवडणूक खर्च हिशोब तपासणी करणे व त्यानंतर अनर्हतेबाबत निर्णय घेण्याचे अधिकार विभागीय आयुक्त यांना प्रदान करण्यात आले आहेत.

ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५, कलम १६ *(१-ड)* अन्वये ज्या उमेदवारांनी निवडणुकीमध्ये केलेल्या खर्चाचा हिशोब शपथपत्रासह, निवडणूक निकाल जाहीर झाल्यापासून ३० दिवसांचे कालावधीमध्ये सादर न केल्यास अशा उमेदवारांना अनर्ह ठरविण्याचे अधिकार विभागीय आयुक्त यांना उक्त वाचामधील संदर्भ क्रमांक २ चे आदेशान्वये मा. राज्य निवडणूक आयोगाने प्रदान केलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, उक्त वाचामधील संदर्भ क्रमांक ३ चे आदेशान्वये नगरपरिषद, नगरपंचायती सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ चा निकाल दिनांक २१ डिसेंबर २०२५ रोजी जाहीर करण्यात आला असून, पुणे जिल्ह्यातील फुरसुंगी, उरुळी देवाची नगरपरिषदेच्या १३ उमेदवारांनी (सोबतच्या परिशिष्ट-अनुसार) निवडणूक खर्चाचा हिशोब निवडणूक निकाल जाहीर झालेपासून ३० दिवसांचे आत म्हणजेच दिनांक २० जानेवारी २०२६ पर्यंत विहित केलेल्या रीतीने सादर केला नसलेबाबत जिल्हा सहआयुक्त, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांनी त्यांचेकडील उक्त वाचामधील संदर्भ क्रमांक ४ चे पत्रान्वये या कार्यालयास कळविले आहे.

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५, कलम १६ *(१-ड)* खालीलप्रमाणे --

**निवडणूक आयोगाचे :--**

अ) अशा व्यक्तीने निवडणुकीच्या खर्चाचा हिशोब विहित कालावधीत निवडणूक आयोगाने ठरवून दिलेल्या पद्धतीनुसार, सादर केला नसेल आणि ;

ब) सादर करण्यास कोणतेही पुरेसे कारण नाही, असे समाधान झाल्यास राजपत्रात प्रसिद्ध करून अशा व्यक्तीस अपात्र ठरवून पुढील ३ वर्षांच्या कालावधीकरिता अपात्र ठरवू शकते.

त्यास अनुसरून परिशिष्ट-अमधील १३ उमेदवारांना विहित कार्यपद्धतीनुसार सुनावणी घेण्यात येऊन या आदेशाद्वारे अनर्ह ठरविण्यात येत आहे.

तसेच मा. राज्य निवडणूक आयोगाचे दिनांक १५ फेब्रुवारी २०२४ चे आदेशान्वये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ कलम १६ *(१-ड)* नुसार अनर्ह करण्यात आलेल्या उमेदवारांचे आदेश राजपत्रात प्रसिद्ध करणेकामी तरतूद केली आहे.

त्याअर्थी, मी, शीतल तेली-उगले (भा.प्र.से.), विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे परिशिष्ट-अमधील १३ उमेदवारांना रकाना क्रमांक ५ मध्ये नमूद आदेशांच्या दिनांकापासून तीन वर्षांचे कालावधीकरिता, पालिका सदस्य म्हणून राहण्यास किंवा पालिका सदस्य होण्यासाठी निवडणूक लढविण्यास अनर्ह असल्याचे घोषित करीत आहे.

सदर आदेश सर्व संबंधिताना कळविण्यात यावा.

**विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचा आदेश क्रमांक नपाप्र/४/नपा/एसआर/५२ ते ६४/२०२६, दिनांक १४ जुलै २०२६ सोबतचे सहपत्र**

**परिशिष्ट - अ**

| अ.क्र. | प्रभाग क्र. | उमेदवाराचे नाव | उमेदवाराचा संपूर्ण पत्ता | महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५, कलम १६ *(१-ड)* अन्वये आदेश निर्गमित केल्याचा क्र., दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | प्रभाग क्र. १-अ | भारती पंकज प्रकाश | त्रिमूर्तीनगर, भेकराईनगर, पुणे | क्रमांक नपाप्र/४/नपा/एसआर/५२/२०२६, दिनांक १४ जुलै २०२६. |
| २. | प्रभाग क्र. १-ब | पवार विजया ज्ञानेश्वर | शिवशंभो बंगला, गणपती मंदिराजवळ, भेकराईनगर, फुरसुंगी, पुणे. | क्रमांक नपाप्र/४/नपा/एसआर/५३/२०२६, दिनांक १४ जुलै २०२६. |
| ३. | प्रभाग क्र. ३-अ | गायकवाड दिपाली श्रीकांत | ७४०/स. नं. २१५, अष्टविनायक कॉलनी गंगानगर फुरसुंगी, पुणे. | क्रमांक नपाप्र/४/नपा/एसआर/५४/२०२६, दिनांक १४ जुलै २०२६. |
| ४. | प्रभाग क्र. ३-अ | शिंदे सोनाली मयूर | गंगानगर, फुरसुंगी, पुणे | क्रमांक नपाप्र/४/नपा/एसआर/५५/२०२६, दिनांक १४ जुलै २०२६. |
| ५. | प्रभाग क्र. ४-अ | डोलारे किरण कबू | चंदवाडी, जुने कॅनॉलजवळ, फुरसुंगी, पुणे. | क्रमांक नपाप्र/४/नपा/एसआर/५६/२०२६, दिनांक १४ जुलै २०२६. |
| ६. | प्रभाग क्र. ४-ब | देशमुख वर्षा अतुल | राहुल स्मृती निवास, रोड नं ०९, आयबीएम कंपनीसमोर, सासवड रोड, फुरसुंगी, पुणे. | क्रमांक नपाप्र/४/नपा/एसआर/५७/२०२६, दिनांक १४ जुलै २०२६. |
| ७. | प्रभाग क्र. १२-अ | मोहिते महेश किसन | विश्वेश्वर बँकेजवळ, तुकाईदर्शन, फुरसुंगी, पुणे. | क्रमांक नपाप्र/४/नपा/एसआर/५८/२०२६, दिनांक १४ जुलै २०२६. |
| ८. | प्रभाग क्र. १४-अ | घोळवे मथुरा युवराज | ७३, संकेत विहार, स्वराज्यनगर, फुरसुंगी, ता. हवेली, जि. पुणे. | क्रमांक नपाप्र/४/नपा/एसआर/५९/२०२६, दिनांक १४ जुलै २०२६. |
| ९. | प्रभाग क्र. १५-अ | भाडळे रूपाली तानाजी | दत्तनगर, उरुळी देवाची | क्रमांक नपाप्र/४/नपा/एसआर/६०/२०२६, दिनांक १४ जुलै २०२६. |
| १०. | प्रभाग क्र. १५-अ | भाडळे सुषमा तात्या | मंतरवाडी, उरुळी देवाची | क्रमांक नपाप्र/४/नपा/एसआर/६१/२०२६, दिनांक १४ जुलै २०२६. |
| ११. | प्रभाग क्र. १५-ब | फिरोज शेख अब्दुल वाजीद | स. नं. २९/२/१, युसुफ पार्क, उरुळी देवाची, हवेली, पुणे. | क्रमांक नपाप्र/४/नपा/एसआर/६२/२०२६, दिनांक १४ जुलै २०२६. |
| १२. | प्रभाग क्र. १६-अ | आदमाने ज्योती राहूल | आदमाने वस्ती, उरुळी देवाची, पुणे | क्रमांक नपाप्र/४/नपा/एसआर/६३/२०२६, दिनांक १४ जुलै २०२६. |
| १३ | प्रभाग क्र. १६-ब | गायकवाड श्रीमंत रुद्रअप्पा | ओसवाल मळा, उरुळी देवाची | क्रमांक नपाप्र/४/नपा/एसआर/६४/२०२६, दिनांक १४ जुलै २०२६. |

**शीतल तेली-उगले** (भा.प्र.से.),
विभागीय आयुक्त,
पुणे विभाग, पुणे.

पुणे, १४ जुलै २०२६.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI–400 004.

EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.